LWE अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच कौशल्य विकास केंद्र यांच्या बांधकामाचे सनियंत्रणासाठी समिती गठीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १११९/२०१९/प्र.क्र.३६/व्यशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ जुलै, २०१९.

प्रस्तावना -

राज्यात डावी कडवी आघाडी (LWE) बाधीत क्षेत्रात युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या उपक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून १००% अनुदान व भांडवली खर्चासाठी ७५:२५ या प्रमाणात अनुदान देण्याची योजना आहे. या अंतर्गत राज्यातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. या जिल्ह्यातील आय.टी.आय./कौशल्य विकास केंद्र (SDC) च्या बांधकामाचा दर्जा सनियंत्रित करण्यासाठी सनियंत्रण समिती (Monitoring Committee) स्थापन करण्याचे निदेश केंद्र शासनाने प्रस्तावित केलेले आहे. या अनुषंगाने राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

शासन निर्णय :-

राज्यात डावी कडवी आघाडी (LWE) बाधीत क्षेत्रात युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या उपक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून १००% अनुदान व भांडवली खर्चासाठी ७५:२५ या प्रमाणात अनुदान देण्याची योजना आहे. या अंतर्गत राज्यातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. या जिल्ह्यातील आय.टी.आय./कौशल्य विकास केंद्र (SDC) च्या बांधकामाचा दर्जा सनियंत्रित करण्यासाठी सनियंत्रण समिती (Monitoring Committee) खालीलप्रमाणे गठीत करण्यासाठी प्रतिनिधी नामनिर्देशित करण्यात येत आहेत:-

बांधकाम दर्जा सनियंत्रित करण्यासाठी राज्य सनियंत्रण समिती

१. अ.मु.स. / प्रधान सचिव,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग - चेअरमन.
२. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नागपूर - बांधकाम केलेल्या इमारतींचा दर्जा तपासणेसाठी.
३. मुख्य अभियंता (विद्युत) - विद्युतीकरण केलेल्या कामाचा दर्जा तपासणेसाठी.
४. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण - समितीचे सचिव व समन्वयक.

राज्य सनियंत्रण समिती मार्फत या योजनांतर्गत होणाऱ्या बांधकामाचा दर्जा तपासण्याबाबत दर महिन्याला आढावा घेण्यात येईल.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१५१४४८१२६१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2019.07.15 14:59:04 +05'30'

(संतोष वि.रोकडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
२. सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,मंत्रालय.
३. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नागपूर.
४. मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग,नागपूर विभाग.
५. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.
७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,गोंदिया/गडचिरोली.
८. प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,पालांदुर/जिमलगट्टा.
९. निवड नस्ती,व्यशि-२.